दिनांक - २९-०९-२०२५ **TERMINAL EXAMINATION (2026)** वेळ - २ तास

इयत्ता - ७ वी - अ,ब,क **मराठी** मार्क - ८०

**INSTRUCTIONS:-** 1.This paper comprises of two sections. Section A and B.
2. Section A answers must be written on the answer sheet.
3. Section B answers must be written on the paper itself. And Attach paper with section A answer sheet

## विभाग - "अ" [४० मार्क]

प्रश्न १. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा. [५]

१. गावातील काही मुले ---------------- झाडाखाली जमली होती.

( पिंपळाच्या , वडाच्या , निंबाच्या )

२. तो होळीचा सण होता. या दिवशी ---------------- होणार हे ठरलेलेच असते.

( झोंबाझोंबी , झोंबाझोंबि, मारामारी )

३. गडाच्या पायथ्याशी ---------------- नदी बारमाही झुळझुळत असते.

( मंदाकीनी, मंदाकिनी , मंदाकिनीं )

४. साधारणपणे ---------------- इंच परीघ असलेला तो लांबच लांब पाइप गोपाळ आगीच्या दिशेने ओढत आणत होता.

( एक-दीड , अडीच-तीन , तीन - चार )

५. इसाबबरोबर ---------------- लढायची तर त्याची अजिबात इच्छा नव्हती.

( कूस्ती , मस्ती, कुस्ती )

प्रश्न २. कोण-कोणास म्हणाले ते लिहा. [२]

१. "माणसं असो का जनावरं" त्यांना वाचवलंच पाहिजे ना!"

२. " नाही,माझी आई मला मारील."

प्रश्न ३अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. **( कोणतेही ५) ANY 5** [५]

१. इसाबच्या वडिलांचे नाव काय होते?

२. प्रार्थना कोणी लिहिली आहे?

३. अमृत व इसाबचे पाय जमिनीला का खिळले?

४. अदलाबदल या पाठाचे कवी कोण आहेत?

५. भविष्यात विदयार्थी कसे होणार आहेत?

६. गोपाळचे शौर्य या पाठाचे कवी कोण आहेत?

प्रश्न ३ ब) खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही २) ANY 2** [४]

१. अमृत आणि इसाब यांच्यामध्ये सारख्या असणाऱ्या गोष्टी कोणत्या आहेत?

२. इसाबच्या वडिलांनी इसाबच्या शर्टासाठी काय-काय केले होते?

३. गोपाळने आग विझवण्यासाठी काय केले?

प्रश्न ४. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

पायथ्याची आग हळूहळू शांत होत होती. "गडावर पुढे पुढे पसरत असलेली आगही आटोक्यात आणली पाहिजे." दुसऱ्या गाडीतील गृहस्थ म्हणाले. "पण साहेब, हे कसं शक्य आहे? मला तर हा वेडेपणाच वाटतो." शिक्षक हतबल झाल्यासारखे बोलले. त्या फोनवरून गृहस्थाने अग्निशामक दलाच्या दोन गाड्यांना बोलावून घेतले आहे हे सरांना सांगितले.

वीस मिनिटांच्या आतच किलोमीटर पंधरा-वीस अंतरावर असलेल्या नरखेडहून अग्निशामकदलाच्या दोन गाड्या गडाच्या पायथ्याशी हजर झाल्या. लगेच त्यांनी पाण्याचा मारा सुरू केला. आग आटोक्यात येऊन संपूर्णतः शांत झाली होती. आता सर्वांचेच चेहरे उजळले होते. सर्वांनाच नवी ऊर्जा मिळाली होती. अशातच गाईवासरं घेऊन गेलेले काही गुराखी मुलांजवळ आले. त्यांतील एकजण हात जोडून म्हणाला, "लय बेस झालं, बापा. आग इझली. गडावरचीतं कितीकंच झाडं झुडपं भाजून निघालीत. जरासा का उशीर झाला असता तंर आम्हीही तसेच भाजून निघालो असतो. आनं आमच्यातं कोनाले पत्ता भी लागला नस्ता, तुम्ही समदं मदतीसं धावून आलेतं" हे सांगताना गुराख्याला गहिवरून आले होते.

"खरंच, आमच्या या गोपाळनं निरपेक्ष भावनेनं, जिवाची पर्वा न करता हे धाडस केलं. आज केवळ गडच नव्हे, तर गुरं आणि या सर्व गुराख्यांचेही प्राण वाचले. त्याचं हे काम खरंच कौतुकास्पद आहे." असे मोठ्या अभिमानाने शिक्षक सर्वांना सांगत होते.
दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रातून ही बातमी सर्वच लोकांना कळाली. शिक्षकांनी आणि परिसरातील नागरिकांनी गोपाळच्या या शौर्याचे भरभरून कौतुक करत होते.

प्रश्न :

**कृती १.** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. गडाच्या पायथ्याशी कोणाच्या दोन गाड्या हजर झाल्या?

२. गोपाळचे कौतुक कोण-कोण करत होते?

**कृती २.** खालील प्रश्नाचे दोन-तीन वाक्यात उत्तर लिहा. [२]

१. गुराख्याला गहिवरून का आले?

**कृती ३.** रिकाम्या जागा भरा. [१]

१. गोपाळनं .................................. भावनेनं, जिवाची पर्वा न करता हे धाडस केलं.

२. "पण साहेब, हे कसं शक्य आहे? मला तर हा ........................................ वाटतो."

**कृती ४.** विरुद्धार्थी शब्द लिहा. [१]

( सरळ, शांत, रागीट , पुढे )

१. मागे X ........................................ २. अशांत X ........................................

प्रश्न ५अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर पत्र लिहा. **(ANY 1)** [५]

१. दिवाळीचा सण आपल्या घरी साजरा करण्यासाठी आपल्या मित्राला/मैत्रिणीला निमंत्रण देणारे पत्र लिहा.

Write a letter inviting your friend to celebrate the festival of Diwali at your home.

**OR**

२. सोनाली शाह, शाह सदन,पटेल मार्ग, औरंगाबाद येथून-श्री. मुख्याध्यापक महात्मा गांधी प्रशाला, पटेल मार्ग, औरंगाबाद यांना पत्र लिहून आठ दिवसांची रजा मंजूर व्हावी यासाठी विनंती पत्र लिहा.

Write a letter to the Headmaster of Mahatma Gandhi School, Patel Marg, Aurangabad, From Sonali Shah, Shah Sadan, Patel Marg, Aurangabad, requesting permission for eight day's leave.

प्रश्न ५ ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा. **(ANY 1)** [५]

१. पर्यावरण वाचवा! **(Save the Environment)**

**मुददे** - पर्यावरण म्हणजे काय - पर्यावरणाचे महत्त्व - त्याचे उपाय - आपण काय केले पाहिजे

२. मोबाईलचे फायदे व तोटे **(Advantages and Disadvantages of Mobile Phones)**

**मुददे** - मोबाईलची ओळख - मोबाईलचा वापर किती व कसा करावा - शिक्षणातील उपयोग - मोबाईलचा योग्य वापर

३. खरा मित्र **(A True Friend)**

**मुददे** - मित्राचे / मैत्रिणीचे नाव - वर्णन - त्याचे गुण - त्याचा आवडलेला एक गुण.

प्रश्न ६. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

गरुड हा अत्यंत चलाख, शक्तिशाली शिकारी पक्षी आहे आणि त्याला पक्ष्यांचा राजा म्हणतात. गरुड बऱ्याच पक्ष्यांपेक्षा मोठे असतात. गरुड साप, छोटे पक्षी. छोटे प्राणी. मासे यांची शिकार करतात. गरुडाचे आयुष्य सामान्यपणे २५ ते ४५ वर्ष इतके असते. सर्पगरुड आकाराने लहान असतात आणि हार्पी गरुड सर्वांत मोठे असतात. त्यांची लांबी सुमारे १०० सेमी असते आणि वजन ९ किलोपेक्षा जास्त असू शकते.

गरुडाकडे शक्तिशाली पंखांचे स्नायूदेखील असतात जे त्यांना जोरदार फडफडत उड्डाण करण्यास सक्षम करतात. टेकऑफ, वेगवान चढाई, शिकारीचा पाठलाग आणि मर्यादित हवेच्या प्रवाह असलेल्या भागात उड्डाण करण्यासाठी फ्लॅपिंग फ्लाइट हे तंत्र महत्त्वपूर्ण आहे. स्थलांतर करताना किंवा शिकार शोधताना ते १०,००० फूट (३,००० मीटर) पेक्षा जास्त उंचीवर जाऊ शकतात. स्नायूंना ऑक्सिजन प्रदान करणाऱ्या विशेष वायू पिशव्यांचा समावेश होतो.

'बाल्ड ईगल' नावाच्या गरुडाच्या पंखाचा फैलाव सुमारे सहा फूट असतो. त्यांची चोच बाकदार आणि बळकट असते. जी मांस फाडण्याच्या कामी येते. तसेच गरुडाचे पंजे आणि नखे सुद्धा बळकट असतात, ज्यांचा उपयोग भक्ष्य पकडण्यासाठी होतो. जंगलात राहणाऱ्या गरुडांचे पंख छोटे आणि शेपूट लांब असते, ज्यामुळे जंगलातील झाडांमधून सावजाची शिकार करणे सोपे जाते. गरुड पक्षी सहसा उंच कड्यावर किंवा उंच झाडावर घरटे बांधतो.'बाल्ड ईगल' हा अमेरिकेचा राष्ट्रीय पक्षी आहे. १० जानेवारी हा 'जागतिक गरुड बचाव दिवस' म्हणून पाळला जातो.

प्रश्न :

**कृती १.** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [३]

१. गरुडाचे आयुष्य किती असू शकते?

२. १० जानेवारी कोणता दिवस म्हणून पाळला जातो?

३. बाल्ड ईगलच्या पंखांचा फैलाव किती असतो?

**कृती २.** खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. गरुडाला शिकार करणे सोपे का जाते?

**कृती ३.** रिकाम्या जागा भरा. [१]

१. .................... आकाराने लहान असतात.

२. त्यांची चोच .................... आणि बळकट असते.

**कृती ४.**अ) समानार्थी शब्द लिहा. [१]

( चालाख, बळकट, चलाख, बाळकट )

१. हुशार - .................... २. मजबूत - ....................

**कृती**४. ब वचन बदला. [१]

१. झाड - .................... २. पिशवी - ....................

**INSTRUCTIONS – Section B answers must be written on the paper itself. And attach paper with Section A answer sheet.**

| | | |
|---|---|---|
| **नाव** - ------------------------------ | **हजेरी क्र.** - ---------------- | **इयत्ता - ७ वी - अ,ब,क** |

**विभाग - "ब"** **[४० मार्क]**

प्रश्न १. खालील वाक्प्रचारांचे अर्थ लिहा. [५]

आग्रह करणे, जबरदस्ती करणे, निराश होणे, समाज देणे, पराभव करणे, निराशा करणे, ताकीद देणे, निर्माण होणे, प्रकट करणे, समज देणे, हिमंत दाखवणे, खूप राग येणे, भीती वाटणे, खुप स्तुति करणे, वार्चस्व गाजवने, खूप स्तुती करणे, भिती करणे, वर्चस्व गाजवणे, हिंमत दाखवणे, खुप राग करणे

१. गळ घालणे - ............ २. हतबल होणे - ............

३. चीत करणे - ............ ४. सादर करणे - ............

५. बजावणे - ............ ६. पारा चढणे - ............

७. धास्ती वाटणे - ............ ८. धाडस करणे - ............

९. भरभरून कौतुक करणे - ............ १०. वरचढ असणे - ............

प्रश्न २. अ) खालील वाक्यातील नामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [३]

१. छत्रपती शिवाजी महाराज हे महान राजे होते.

नाम - ............ नामाचा प्रकार - ............

२. मुलगा मैदानावर क्रिकेट खेळत आहे.

नाम - ............ नामाचा प्रकार - ............

३. प्रामाणिकपणा हा मोठा गुण आहे.

नाम - ............ नामाचा प्रकार - ............

प्रश्न २.ब) खालील सर्वनाम ओळखा. [३]

१. आम्ही उद्या सहलीला जाणार आहोत. सर्वनाम - ............

२. ज्याने हे काम केले आहे,त्याने पुढे यावे. सर्वनाम - ............

३. कोण दार ठोठावत आहे? सर्वनाम - ............

प्रश्न २. क)खालील वाक्यातील विशेषण ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [३]

१. सुंदर फुले बागेत फुलली आहेत.

विशेषण - ........................ विशेषणाचा प्रकार- ........................

२.माझ्याकडे दोन पुस्तके आहेत.

विशेषण - ........................ विशेषणाचा प्रकार- ........................

३. हा मुलगा माझा मित्र आहे.

विशेषण - ........................ विशेषणाचा प्रकार- ........................

प्रश्न ३.अ) समानार्थी शब्द लिहा. [३]

पांडीत्य, दिप, कुशळ, संकेत, गंमत, जरूर, पांडित्य, सांकेत, गमंत, दीप, कुशल, जरूर

१. खूण - ........................ २. मौज - ........................

३. दिव - ........................ ४. विदवत्ता - ........................

५. सुगरण - ........................ ६. गरज - ........................

प्रश्न ३.ब) विरुद्धार्थी शब्द लिहा. [३]

नापीक, नास्तिक, दूय्यम, बीजारोपन, निंद्रिस्त, अर्वाचीन, नास्तीक, निद्रीस्त, अर्वाचिन, दुय्यम, नापिक, बीजारोपण

१. प्राचीन X ........................ २. उत्तम X ........................

३. सुपीक X ........................ ४. जागृत X ........................

५. निर्मूलन X ........................ ६. आस्तिक X ........................

प्रश्न ३. क) वचन बदला. [३]

१. भाजी- ........................ २. ओवी- ........................

३. सत्कार्य - ........................ ४. मुजरा - ........................

५. शिष्यवृत्ती - ........................ ६. बाहुली - ........................

प्रश्न ३. ड) लिंग बदला. [३]

१. नातू - ........................ २. पुढारी - ........................

३. नायक - ........................ ४. गंधर्वपुत्र - ........................

५. सोबती - ........................ ६. इंद्र - ........................

प्रश्न ४. अ)खालील शब्दांतील अचूक शब्द ओळखा. [३]

१. कौतुकास्पद, कौतूकास्पद,कौतुकस्पद, कौतुकास्पन्द - ..................

२. नीतिमांत, नीतिमंत, नीतिमम्त, नितिमंत - ..................

३. गुण्यागोविन्दानी, गुण्यागोविदानें, गुण्यागोवींदाने, गुण्यागोविंदाने - ..................

प्रश्न ४.ब) खालील शब्दांचे अर्थ लिहा. [३]

युक्ती, ओढ, हिमंत, पूरातन, हुषार, रागावून, पुरातन, यूक्ती, हिंमत, हुशार, ओढ, रागावुन

१. पौराणिक- .................. २.कल्पना - ..................

३. ध्यास - .................. ४. धाडस - ..................

५. बुध्दिमंत - .................. ६. दरडावून - ..................

प्रश्न ४.क) खालील दिलेल्या शब्दांपासून अर्थपूर्ण वाक्य बनवा. [३]

१. गड (Fort)- ..................

२. मैदान (Ground)- ..................

३. प्रार्थना (Prayer)- ..................

प्रश्न ५ अ) खालील विरामचिन्हांच्या योग्य जोड्या लावा. [२]

| क्र. | विरामचिन्हे | उत्तर | चिन्हांची नावे |
|---|---|---|---|
| १. | ! | .................. | अवतरणचिन्ह |
| २. | - | .................. | अर्धविराम |
| ३. | "-" | .................. | संयोगचिन्ह |
| ४. | ; | .................. | उदगारचिन्ह |

प्रश्न ५ब) खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. [३]

१. आपल्या लहरीप्रमाणे वागणारा- ..................

२. अनेकांमधून निवडलेले - ..................

३. अस्वलाचा खेळ करणारा - ..................